महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

epaper.shauryaMarathi.com | वर्ष : - १ ले | अंक :- ७६ | शनिवार दि.१८ जानेवारी २०२५ पान :- ४ किंमत ५ रु. | जळगाव


## पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघात; ट्रकने कारला उडवल्याने ९ जणांचा मृत्यू

### मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे- पुण्यातील नारायणगाव परिसरात झालेल्या भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. पुणे-नाशिक महामार्गावर ट्रकने एका कारला पाठीमागून धडक दिल्याने हा अपघात झाला. धडक बसल्यानंतर ही कार पुढे थांबलेल्या एका बसला धडकली अशी माहिती पुणे ग्रामीणचे पोलीस अधिक्षक पंकज देशमुख यांनी दिली आहे.

दरम्यान या भीषण अपघातानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत अपघातील मृतांच्या कुटुंबियांसाठी मदतीची घोषणा केली आहे. तसेच त्यांनी कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचेही म्हटले आहे.

पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगाव जवळ झालेल्या



भीषण अपघातात ९ कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करतो. मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून करण्यात येईल. जखमींच्या उपचाराची योग्य काळजी घ्या, असे मी पुणे पोलिस अधीक्षक यांना सांगितले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निघाले दावोसला

### राज्यात परकीय गुंतवणुकीवर देवेंद्र फडणवीस देणार भर

मुंबई - राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २० ते २४ जानेवारी या काळात दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी होणार आहेत. यासाठी १९ तारखेला पहाटे ते मुंबईतून रवाना होणार आहेत. महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक आणण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे.

यापूर्वी देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या पहिल्या कार्यकाळात



३ वेळा दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी झाले होते. त्यावेळी औद्योगिक विकासात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आला होता. राज्यात २०१४-१९ काळात मॅग्नेटिक महाराष्ट्राचे दोन वेळा आयोजन झाले. आताही या दौर्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भरगच्च कार्यक्रम दावोस दौर्यात राहणार आहेत. अनेक जागतिक नेत्यांच्याही ते भेटी घेणार आहेत. या दौर्यात उद्योगमंत्री उदय सामंत तसेच एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको अधिकार्यांचे शिष्टमंडळ त्यांच्यासोबत असेल.

## पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना १४ वर्षांची शिक्षा ; 'या' प्रकरणात न्यायालयाने दिला निर्णय

नवी दिल्ली- पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्तरदायित्व ब्युरो) ने डिसेंबर २०२३ मध्ये खान (७२), बीबी (५०) आणि इतर सहा जणांविरुद्ध राष्ट्रीय तिजोरीला १९० दशलक्ष पौंड (५० अब्ज पाकिस्तानी रुपये) नुकसान पोहोचवल्याचा आरोप करत खटला दाखल केला.

या प्रकरणात न्यायालयाने बुशरा बीबीला सात वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आणि खान यांना १० लाख पाकिस्तानी रुपये आणि त्यांच्या



पत्नीला ५ लाख पाकिस्तानी रुपये दंड देखील ठोठावला आहे.

तथापि, फक्त खान आणि बीबी यांच्यावरच खटला चालवण्यात आला आहे, कारण एका प्रमुख प्रॉपर्टी टायकूनसह इतर आरोपी सध्या पाकिस्तानबाहेर आहेत, असे डॉनने वृत्त दिले आहे.

## मनू भाकर आणि डी गुकेश यांना राष्ट्रपतींनी केले खेलरत्न पुरस्काराने सन्मानित

मुंबई- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दि. (१७ जानेवारी रोजी भारतीय क्रिडा क्षेत्रातील दिग्गज खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न व अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रपतींद्वारे ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनु भाकर, जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत विजयी ठरलेला डी गुकेश, भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंह आणि पॅरा ॲथलीट प्रवीण कुमार



या ४ खेळाडूंचा मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. भारतासाठी पहिले पॅराल्मिपिक सुवर्णपदक जिंकणारे मुरलीकांत पेटकर यांचा अर्जुन पुरस्काराने (आजीवन) सन्मान करण्यात आला.

या ४ खेळाडूंव्यतिरिक्त ३२ इतर खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय, राष्ट्रपती मुर्मू यांनी अर्जुन पुरस्कार (आजीवन), राष्ट्रीय खेल प्रोत्साहन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार (नियमित आणि आजीवन) आणि मौलाना अबुल कलाम आझाद ट्रॉफीच्या विजेत्यांनाही सन्मानित केले.विशेष म्हणजे यंदाच्या खेलरत्न व अर्जुन पुरस्कारामध्ये एकाही क्रिकेटपटूंचा समावेश नाहीये. याशिवाय, प्रशिक्षक श्रेणीमध्येही एकाही व्यक्तीचा समावेश करण्यात आलेला नाही.२२ वर्षी मनु भाकरने पॅरिस ऑल्मिपिकमध्ये नेमबाजी स्पर्धेत दोन कांस्यपदकांवर नाव कोरण्याची कामगिरी केली होती. याशिवाय, १८ वर्षीय डी गुकेश हा जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत विश्वविजेता ठरला आहे. टोकियो आणि पॅरिस ऑल्मिपिकमध्ये भारतीय हॉकी संघाला कांस्यपदक मिळाले होते. या स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व हरमनप्रीत सिंहने केले होते.

तसेच, पॅरिस पॅराल्मिपिकमध्ये पुरुषांच्या हाय जंप-टी६४ स्पर्धेत प्रवीण कुमारने सुवर्णपदक जिंकण्याची कामगिरी केली होती. या चारही खेळाडूंना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## महिलांना दरमहा २५०० रुपये, सिलिंडरवर सबसिडी, दिल्ली निवडणुकीसाठी भाजपची मोठी घोषणा

नवी दिल्ली- भाजपने दिल्ली विधानसभा निवडणुक २०२५ साठी जाहीरनाम्याचा पहिला भाग प्रसिद्ध केला आहे. भाजपचे ठराव पत्र पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांनी मांडले. घोषणा करताना नड्डा म्हणाले की, आमचे सरकार सत्तेवर आल्यावर दिल्लीतील महिलांना दरमहा २५०० रुपये दिले जातील. यासोबतच गॅस सिलिंडरवर ५०० रुपये सबसिडी दिली जाणार आहे. याशिवाय दिवाळी आणि होळीला एक सिलिंडर मोफत दिला जाणार आहे. दरम्यान, दिल्ली विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची आज शेवटची तारीख आहे. ५ फेब्रुवारीला दिल्लीतील सर्व ७० विधानसभा जागांवर एकाच वेळी मतदान होणार असून ८ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

**भाजपच्या ठराव पत्रातील महत्त्वाचे मुद्दे -**

१. महिला समृद्धी योजनेअंतर्गत महिलांना दरमहा २५०० रुपये दिले जातील.२. होळी आणि दिवाळीला सिलिंडर मोफत दिला जाईल.

३. सिलिंडरवर ५०० रुपये सबसिडी दिली जाईल.४. गर्भवती महिलांना २१ हजार रुपये दिले जातील.५. गर्भवती महिलांना पोषण किट दिले जातील.६. ५ लाख रुपयांचा आरोग्य विमा दिला जाईल.७. केंद्र सरकारची आयुष्मान भारत योजना दिल्लीत लागू होणार आहे.८. झोपडपट्ट्यांमध्ये ५ रुपयात रेशन दिले जाईल. ९.



वृद्धांना ३,००० रुपये पेन्शन दिली जाईल.

संकल्प पत्र जारी करण्यापूर्वी भाजप अध्यक्ष म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राजकीय संस्कृती बदलली आहे. पूर्वी जाहीरनामे यायचे, पण पक्ष विसरायचे. आता जाहीरनाम्याचे रुपांतर संकल्प पत्रात करण्यात आले आहे. आमची आश्वासने पाळण्याचा आमचा रेकॉर्ड अव्वल राहिला आहे. विकसित दिल्लीच्या पायाभरणीचा हा जाहीरनामा आहे. दिल्लीच्या हमी योजना सुरू राहतील. आमच्या सरकारच्या काळात २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेतून बाहेर आले आहेत. भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतरही दिल्लीत सुरू असलेल्या लोककल्याणकारी योजना सुरूच राहणार आहेत.

**आपने दिली ही मोठी आश्वासने**

आत्तापर्यंत 'आप'नेही अनेक मोठमोठी आश्वासनेही दिली आहेत. संजीवनी योजनेंतर्गत ६० वर्षांवरील व्यक्तींना खासगी आणि सरकारी रुग्णालयात मोफत उपचार मिळणार आहेत. पुजारी ग्रंथी योजनेंतर्गत दरमहा १८ हजार रुपये दिले जातील. महिला सन्मान योजनेंतर्गत दरमहा २१०० रुपये दिले जातील.


**काँग्रेसने हे आश्वासन दिले**

याशिवाय काँग्रेसनेही ५ हमी जाहीर केल्या आहेत. महागाई निवारण योजनेंतर्गत मोफत रेशन किट, ५०० रुपयांना गॅस सिलिंडर आणि ३०० युनिट मोफत वीज देण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले आहे.

याशिवाय प्रत्येक महिन्याला जीवन रक्षा योजनेंतर्गत महिलांना २५०० आणि २५ लाख रुपयांचे मोफत उपचार केले जाणार आहेत. उडान योजनेंतर्गत शिकाऊंना ८५०० रुपये प्रति महिना देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.

## बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान वरील संशयीत हल्लेखोर ताब्यात

मुंबई : बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानच्या घरात घुसून चाकूहल्ला करण्यात आल्याने देशभरात खळबळ उडाली असताना, बॉलिवूड इंडस्ट्रीसह राज्याच्या कायदा सुव्यवस्थेबाबत एक गंभीर बाब समोर आली आहे. अभिनेता सैफ अली खानवरील हल्ल्याचे प्रकरण ताजे असतानाच अभिनेता शाहरुख खानच्या घरात अशाच पद्धतीने घुसण्याचा एकाने प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. २-३ दिवसांपूर्वी शाहरुखच्या मुंबईतील मन्नत बंगल्यात घुसखोरी करण्याचा एका अज्ञात इसमाने प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र



काय? हे अद्याप अस्पष्ट आहे. दुसरीकडे सैफ अली खानवर हल्ला करणारा आणि शाहरुखच्या घरात घुसखोरी करणारा व्यक्ति एकच असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे. मात्र या प्रकरामुळे सुरक्षा आणि कायदा सुव्यवस्थेबाबत अनेक प्रश्न आता विचारले जात आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सैफ अली खानवर हल्ला करणा-या व्यक्तीने मुंबईतून पळ काढून नालासोपारा -विरारच्या दिशेने आपला मार्गक्रमण केला आहे. या संदर्भात सुरक्षेच्या दृष्टीने नालासोपारा -विरार परिसरातील सर्व रेल्वे स्थानकं, बसस्थानकं, तसेच मुख्य रस्त्यांवर पाहणी करण्यात येत आहे. मुंबई पोलिसांनी मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयांकडून कोणतीही मदत मागितली नाही. स्वत: सर्च ऑपरेशन करत असल्याची माहितीही पुढे आली आहे.

## बीड जिल्हा पुन्हा हादरला; जमावाच्या हल्ल्यात दोन सख्ख्या भावांचा मृत्यू, तिसरा गंभीर जखमी

बीड- बीड जिल्ह्यात मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. राज्यभराचे लक्ष बीड जिल्ह्याकडे लागले. या प्रकरणातील आरोपींना कडक शिक्षा व्हावी, यासाठी सर्वच क्षेत्रातून दबाव वाढला. मात्र तरीही बीडमधील गुन्हे थांबण्याचे चित्र दिसत नाही. गुरुवारी रात्री आष्टी तालुक्यातील वाहिरा नावाच्या गावात दोन सख्या भावांची जमावाने हत्या केली. या घटनेनंतर बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे. पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेऊन चौकशी सुरु केल्याची माहिती मिळत आहे.

संतोष देशमुख प्रकरणात भाजपाचे आमदार सुरेश धस पहिल्या दिवसांपासून आक्रमक पद्धतीने आवाज उचलत आहेत.

याच सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघात सदर घटना घडली आहे. आष्टी तालुक्यातील वाहिरा येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास काही लोकांनी लोखंडी रॉड, धारदार शस्त्राने तीन भावांवर हल्ला केला. या हल्ल्यात दोन संख्या भावांचा जागीच मृत्यू झाला. तर आणखी एक जण गंभीर जखमी आहे. याप्रकरणी अंभोरा पोलीस अधिक तपास करत आहेत.

अजय भोसले आणि भरत भोसले असे मृत भावांचे नाव असून कृष्णा भोसले हा गंभीर जखमी आहे. हे तिघेही त्यांच्या गावात उभे असताना गावातील आणि बाहेरील काही लोक जमा झाले. यातील काही लोकांनी या तीनही भावांवर शस्त्राने हल्ला चढवला. मारहाण आणि खून नेमका कोणत्या कारणाने झाला? हे मात्र अद्याप समजले नसून आष्टी ग्रामीण रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन सुरू आहे.

## महाराष्ट्र राज्य ठरले भारतातील पहिले ए-वन धोरण ठरवणारे राज्य!

### माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी स्थापन केला राज्यातील पहिला ए-वन पॉलिसी टास्कफोर्स

मुंबई -माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या सरकारच्या १०० दिवसीय कृती आराखड्याचा भाग म्हणून, राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता ए-वन धोरण तयार करण्यासाठी ए-वन पॉलिसी टास्कफोर्स स्थापनेस मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या माहिती तंत्रज्ञान मंत्रालया मार्फत तयार करण्यात येणारे ए-वन पॉलिसी २०२५ राज्याच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उद्योगांच्या वेगवान वाढीसाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. त्यासंदर्भात ए-वन पॉलिसी टास्कफोर्स स्थापनेसंबंधित शासन निर्णय देखील आज जाहीर करण्यात आला आहे.

राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. की, महाराष्ट्राचे ए-वन धोरण या औद्योगिक विकासाला चालना देईल आणि महाराष्ट्राला येणाऱ्या काही वर्षांत १ ट्रिलियन डॉलर्सची



जीडीपी गाठण्याच्या उद्दीष्टाच्या दिशेने पुढे नेईल.

महाराष्ट्राचे ए-वन धोरण, भारत सरकारच्या च्या चौकटीवर आधारित असून हे ए-वन धोरण महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी तयार करण्यात आलेले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ए-वन धोरण आणि योजना तयार करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून या समितीमध्ये सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, नियोजन विभाग या तिन्ही विभागाचे उप सचिव, एसइएमटी प्रमुख, डॉ. विजय पागे, संचालक ब्रम्हा रिसर्च फाऊंडेशन मुंबई, नरेन कचरु, प्रमुख एआय, गुगल इंडिया, रोहित किलम, चीफ टेक्नॉलॉजी ऑफीसर एचडीएफसी लाईफ, भुवन लोढा, सीइओ, एआय डीवहीजन, महिंद्रा ग्रुप, विवेक माथुर, पार्टनर डेलॉईट, अमित दास, सीइओ थिंक ३६० एआय, डॉ. राजन वेळूकर, कुलगुरु ॲटलस स्किलटेक विद्यापीठ, माजी कुलगुरु मुंबई विद्यापीठ, सुनिल गुप्ता, संस्थापक क्युएनयु लॅब, संचालक कॉर्पोरेट नियोजन, माझगांव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड, राष्ट्रीय सायबर सुरक्षा समन्वयक कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा कॅबिनेट सचिवालय यांचे प्रतिनिधी, कक्ष अधिकारी(तांत्रिक) या सदस्यांचा समावेश आहे.

## फवारणी पंप खरेदी घोटाळ्याप्रकरणी कोर्टाने विचारला धनंजय मुंडेंना जाब

मुंबई : राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे पुन्हा एका वादात अडकले आहेत.

मागील महायुतीच्या काळात ते कृषी मंत्री असताना त्यांनी कृषी साहित्य खरेदीच्या धोरणात बदल केला होता. हा बदल आता वादात सापडला आहे. धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात धोरण कशासाठी बदलले? असा जाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विचारला आहे. राज्य सरकारला हायकोर्टाने स्पष्टीकरण मागितले आहे.

राजेंद्र मात्रे यांनी नागपूर खंडपीठात एक जनहित याचिका दाखल केलेली आहे. त्यानुसार कृषी विभागाने ५ डिसेंबर २०१६ रोजी कृषी साहित्य खरेदीसाठी डीबीटी योजना सुरू केली होती. पण २०२३ मध्ये धनंजय मुंडे कृषीमंत्री असताना त्यांनी या धोरणात बदल केला. त्यांनी डीबीटी योजना बंद केली. स्वत: विभागाने कृषी साहित्य खरेदीचा निर्णय घेतला. त्यासाठी राज्य सरकारने १०३.९५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला.

याचिकेत म्हटल्याप्रमाणे हे धोरण बदलताच कृषी साहित्य खरेदीत घोटाळा झाला. बाजारात स्वस्त असलेले साहित्य चढादराने खरेदी केल्याचे दाखवले. त्यासाठी सरकारी निधीचा वारेमाप खर्च करण्यात आला. १२ मार्च २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार, बॅटरीवर चालणारा स्प्रे पंप खरेदीसाठी १५०० रुपये प्रतिपंप या दराने ८०.९९ कोटी रुपयांचा निधी देण्याचे निश्चित केले. परंतु शासनाने तीन लाख तीन हजार ५०७ पंप हे १०४ कोटी रुपयांना खरेदी केले.

याचिकेतील दाव्यानुसार, सरकारला एक पंप हा ३,४२५ रुपयांना मिळाला. यवतमाळ येथील एका कृषी साहित्य विक्री दुकानात हाच पंप अवघ्या २,६५० रुपयांना मिळतो. सरकार एकदाच इतकी मोठी खरेदी करत असेल तर त्यांना सवलत मिळणे अपेक्षित होते. हा पंप अजून स्वस्तात मिळाला असता, मग चढ्यादराने ही खरेदी का करण्यात आली असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

याप्रकरणात न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी कृषी मंत्र्यांनी कोणत्या आधारावर कृषी साहित्य खरेदीचे धोरण बदलले असा सवाल कोर्टाने विचारला. तर राज्य सरकारला दोन आठवड्यात स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले.

## सैफ अली खान हल्ला प्रकरणात गुन्हेगारी टोळीचा हात नाही - गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची माहिती

पुणे : चित्रपट अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या हल्ल्यात गुन्हेगारी टोळीचा हात नसल्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. हल्ला प्रकरणात एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून, चोरीच्या उद्देशाने हल्ला झाल्याचे त्यांनी सांगितले.

योगेश कदम यांनी शुक्रवारी पुणे पोलीस आयुक्तालयास भेट दिली. कदम यांच्या उपस्थितीत पोलीस आयुक्तालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. बैठकीनंतर कदम यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुंबईतील वांद्रे भागात सैफ अली खान याच्या निवासस्थानात शिरुन हल्ला करण्यात आल्याची घटना गुरुवारी घडली. यापूर्वी वांद्रे भागात अभिनेता सलमान खान याच्या निवासस्थानावर गोळीबार करण्यात आला. माजी आमदार बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळ्या झाडून खून करण्यात आला. या दोन्ही घटनांमागे लॉरेन्स बिष्णोई टोळीचा हात आहे. खान याच्यावर झालेल्या हल्ल्यामागे गुन्हेगारी टोळीचा हात आहे का ? असा प्रश्न पत्रकारांनी उपस्थित केला.

## संपादकीय

# आंदोलनांचे भरकटणे!

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडला बुधवारी ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावण्यात आली. बुधवारी केज न्यायालयाऐवजी बीड जिल्हा सत्र न्यायालयातील विशेष मोक्का कोर्टात सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान तपास अधिका-यांकडून नवनवीन दावे आणि माहिती कोर्टात सादर करण्यात आली. आरोपीच्या वतीने उच्च न्यायालयातील विधिज्ञ सिद्धेश्वर ठोंबरे यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे बाजू मांडली. तर सरकार पक्षाच्या वतीने विशेष अभियोक्ता बी. डी. कोल्हे यांनी आरोपींच्या परस्पर संभाषणाची चौकशी करण्यासाठी पोलिस कोठडीची आवश्यकता असल्याचे न्यायालयासमोर मांडले. सुमारे दोन तास याबाबतचा युक्तिवाद सुरू होता. संतोष देशमुख हत्या प्रकरणात दाखल गुन्ह्यात मोक्का लावण्यात आला आहे. या प्रकरणात विशेष तपास पथकाने (एसआयटी) वाल्मिक कराडचा गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशीसाठी ताबा मागितला होता. वाल्मिक कराडने हत्येचा कट रचल्याचा दावा एसआयटीने केल्यानंतर केज न्यायालयाने एसआयटीला वाल्मिक कराडचा ताबा घेण्याची परवानगी दिली होती.

त्यानंतर बुधवारी एसआयटीने वाल्मिक कराडचा ताबा घेऊन त्याला दुपारी २ वाजता मोठ्या पोलिस बंदोबस्तात बीडच्या विशेष मोक्का न्यायालयासमोर हजर केले होते. न्यायालयात एसआयटीच्या अधिका-यांनी विविध मुद्यांच्या अनुषंगाने वाल्मिक कराडच्या १० दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती. आरोपीसोबतचे वाल्मिक कराडचे संभाषण या मुख्य मुद्यावर एसआयटीने भर दिला होता. वाल्मिक कराडवर याआधी दाखल झालेल्या गुन्ह्यांची यादी सरकार पक्षाकडून सादर करण्यात आली होती. फरार कृष्णा आंधळेला लपवण्यात कराडचा हात आहे का, याची माहिती घ्यायची आहे, घुले आणि चाटे अनेक दिवस फरार होते. त्यांना कोणी मदत केली याची माहिती घेणे सुरू आहे. त्यामुळे आरोपीला १० दिवसांची पोलिस कोठडी द्या अशी मागणी सरकारी वकिलांनी केली होती. वाल्मिक कराडसाठी युक्तिवाद करताना त्याचे वकील सिद्धेश्वर ठोंबरे म्हणाले, खुनाच्या प्रकरणातील कोणत्याही आरोपीने वाल्मिक कराडचे नाव घेतले नाही, वाल्मिक कराडविरुद्ध कुठलाही ठोस पुरावा नाही. त्यामुळे वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा लागू होऊ शकत नाही. कराडची अटक बेकायदेशीर आहे.दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्या. सुरेखा पाटील यांनी आरोपी वाल्मिक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली. निकाल ऐकण्यासाठी न्यायालयाबाहेर प्रचंड गर्दी जमली होती. एसआयटी कोठडी मिळाल्यानंतर मोठ्या पोलिस बंदोबस्तात पोलिस व्हॅनमधून कराडला बीड शहर ठाण्याकडे नेण्यात आले. त्यानंतर काही मिनिटांत न्यायालयाबाहेर थांबलेल्या कराड समर्थकांनी घोषणाबाजी सुरू केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी काही जणांची धरपकड करून त्यांना पोलिस वाहनातून शिवाजीनगर ठाण्यात नेण्यात आले. या प्रकरणी जमावबंदीचे उल्लंघन केल्याबद्दल काही वकिलांसह २५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. न्यायालय परिसरात अचानक सुरू झालेल्या आंदोलनामुळे पोलिस अॅक्शन मोडवर आले. त्यांनी घोषणाबाजी करणा-या जमावाला न्यायालय परिसरातून हुसकावून लावले. दंगल नियंत्रण पथकाचे जवानही गर्दीला पांगवण्यासाठी पुढे आले.न्यायालय परिसरात अर्धा तास हा गोंधळ सुरू होता. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असा उल्लेख होणा-या भारतामध्ये आंदोलन हे या लोकशाहीने दिलेले हत्यार आहे. परंतु आज या हत्याराचा योग्य प्रकारे वापर केला जात आहे का याबाबत शंकेचे मळभ निर्माण झाले आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर जी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि ज्या प्रकारे परस्परविरोधी आंदोलने होत आहेत ती पाहता पोलिस यंत्रणा आणि न्याययंत्रणा यांच्यावर दबाव आणण्यासाठीच या आंदोलनांचा वापर केला जात आहे असे दिसते. भारतातील नागरिकांना आंदोलने नवी नाहीत. अनेकवेळा ती एखाद्या सामाजिक उपक्रमासाठी अथवा मागणीसाठी केली जातात. त्यामागे सामाजिक हेतू असतो पण जेव्हा वैयक्तिक हेतूसाठी किंवा सरकारी यंत्रणांवर दबाव आणण्यासाठी आंदोलनांचा आधार घेतला जातो तेव्हा ती चुकीच्या दिशेने जात आहेत का अशी शंका येते. ब-याच अंशी ती खरी असते. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील तथाकथित सूत्रधार वाल्मिक कराड याला मोक्का लावा या मागणीसाठी संतोषच्या कुटुंबियांनी आंदोलन केले होते. त्यानंतर कराडला मोक्का लावण्यात आला.न्यायालयात या प्रकरणाचा निकाल काय लागेल तो लागेल. कराडने अनेक गुन्हे केल्याचे स्पष्ट दिसत असतानाही त्याला मोक्का लावला जात नाही म्हणून आंदोलन झाले ते योग्यच होते पण कराडला मोक्का लावल्यानंतर त्याच्या समर्थकांनी आंदोलन करण्याचे काय कारण? न्यायालयात दूध का दूध, पानी का पानी होईपर्यंत थांबा ना! हत्या प्रकरणात गुंतलेल्या आणि अटक झालेल्या इतर आरोपींना मोक्का लावला जातो पण त्यातून कराडला वगळले जाते हे कसे काय? संतोष देशमुख यांच्या भावाने केलेल्या आंदोलनाच्या दबावाखाली पोलिसांनी कराडला मोक्का लावला काय असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कराडच्या समर्थकांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या आईने माध्यमासमोर येऊन आपली बाजू मांडली. म्हणजेच कोणत्याही घटनेला दोन बाजू असतात. एक खरी तर दुसरी खोटी असते. परंतु जेव्हा दोन्ही बाजूंनी आंदोलने होऊ लागतात तेव्हा पोलिस आणि न्याय यंत्रणेने कसे काम करावे असा प्रश्न निर्माण होतो. अशा घटनांमागे राजकारणही असू शकते. जेव्हा पोलिस तपास यंत्रणांबाबत समाजमनात अविश्वासाची भावना असते तेव्हाच अशा प्रकारची आंदोलने होतात.अर्थात दबाव वाढवणे हाच आंदोलनामागचा हेतू असतो. सरपंच हत्येनंतर अनेक ठिकाणी नागरिक रस्त्यावर आले.

# दोंडाईचात मोटारसायकल रॅलीने वेधले लक्ष, शिवरत्न जिवा महाला यांना अभिवादन

दोंडाईचा -प्रताप गडाच्या रणसंग्रामात जिवाची बाजी लावणारे शूर शिलेदार जिवा महाला यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाला पुष्पहार अर्पण करून जिवा महाला यांना अभिवादन करण्यात आले. तसेच नाभिक समाज युवक मंडळाच्या वतीने मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

मोटार सायकल रॅली ही डी. आर. हायस्कूल, गुरव स्टॉप, आझाद चौक, पिंपळ चौक, गणपती मंदिर, संतोषी माता मंदिर, नुतन कॉलेज, नंदुरबार चौफुली, शिव स्मारकमार्गे



राजपथावरून मानराज गल्ली, राम मंदिर येथुन दादासाहेब रावल स्टेडियम येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. त्यानंतर येथे अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी समाजातील १४ वर्षांपासून शिव जयंती उत्सवमध्ये छत्रपती शिवाजी महाराज बनण्याचा बहुमान मिळवणारे राकेश चित्ते यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नुकतीच खान्देश मराठी पत्रकार संघाच्या उपाध्यक्षपदी पदी समाधान ठाकरे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा देखील नाभिक समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नाभिक दुकानावर संघाचे जिल्हाध्यक्ष रविंद्र सैंदाणे, तालुकाध्यक्ष रवींद्र चित्ते, शहराध्यक्ष दिलीप सैंदाणे, दुकानदार संघटनेचे शहराध्यक्ष अनिल ईशी, युवक मंडळाचे शहराध्यक्ष राजेश मिस्तरी, महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रतिनिधी बन्सीलाल चित्ते, मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगेश मिस्तरी, समाधान ठाकरे, मुकेश चित्ते, जगदीश ईशी, गुलाब पवार, संदीप पवार, अनिल चित्ते, नितीन सूर्यवंशी आदी युवक मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास माजी शहराध्यक्ष छोटू महाले, राजेंद्र मोरे, अशोक सोनवणे, महेंद्र चित्ते, रमेश मोरे, गोकुळ सैंदाणे, केंद्र भदाणे, छोटू चित्ते, राकेश चित्ते, गोपाल बोरसे, किरण सूर्यवंशी, विशाल महाले, नंदू मोरे रमेश खोंडे, कैलास चित्ते, भूषण अहिरे, मच्छिंद्र पवार, योगेश सूर्यवंशी, भूषण सोनवणे, अर्जुन चित्ते, प्रशांत पवार, दीपक सैंदाणे, शरद वरसाळे, चेतन महाले, अमोल बोरसे, जयेश वसाने, जयेश पवार, प्रशांत सैंदाणे, भरत वरसाळे, राजेंद्र सोलंकी यांच्यासह समाजातील विविध संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्य व नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जीवनाच्या संघर्षात विजिगीषू वृत्तीने लढा द्या - आयुक्त

धुळे - जीवनाच्या संघर्षात नेहमीच विजिगीषू वृत्तीने लढा द्या. स्वप्न बघा व ती पूर्ण करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घ्या. कधीही नाउमेद होऊ नका, असे प्रतिपादन धुळे महापालिकेच्या प्रशासक अमिता दगडे पाटील यांनी विद्यावर्धिनी महाविद्यालयात कला महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केले.




अध्यक्षस्थानी विद्यावर्धिनी गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन अक्षय छाजेड होते. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यावर्धिनी सभेचे अध्यक्ष माजी आ.प्रा. शरद पाटील, सेक्रेटरी व खजिनदार युवराज करनकाळ, व्हा. चेअरमन उदय शिनकर, सदस्य पितांबर महाले, जगदीश गायकवाड, प्रा. अनिल दामोदर, अशोक सुडके, जगदीश भगत, प्राचार्य डॉ. मधुकर वानखेडे, कला मंडळ प्रमुख डॉ. राजवी कला महोत्सव वीरेंद्रसिंग गावित, उपप्राचार्य डॉ. योगेश पाटील, राहुल वाघ उपस्थित होते. अमिता पाटील पुढे म्हणाल्या की, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी निवडक बाबींशी कधीच चिकटून बसू नये. वेगवेगळी कौशल्य विकसित करतांना आपल्या शरीर सौष्ठवाकडेही लक्ष द्यावे. मोबाईलचा अतिवापर टाळावा आणि एकमेकांशी थेट व प्रत्यक्ष संवाद साधून चैतन्यमय संबंध प्रस्थापित करावेत. प्रयत्न करणाऱ्यांचा पराभव कधीच होत नाही त्यामुळे आपल्या जीवनाच्या संघर्षाचे मैदान कधीच सोडू नका, असा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमात अक्षय छाजेड व प्राचार्य वानखेडे यांनीही मार्गदर्शन केले. चार दिवस मोठ्या उत्साहात चाललेल्या या वार्षिक कला महोत्सवात विद्यार्थी प्राध्यापक यांच्यातील क्रिकेटचा सामना रोमहर्षक ठरला. याबरोबरच रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, गीत गायन, समूहनृत्य, वैयक्तिक नृत्य, लघु नाटिका, वेशभूषा स्पर्धा, अंताक्षरी स्पर्धा, शेलापागोटे आणि पाककला स्पर्धा अशा विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन स्पर्धा ही घेण्यात आल्या.

कार्यक्रमात सूत्रसंचालन डॉ. सतीश निकम व डॉ. विजय पालवे यांनी केले. तर आभार डॉ उज्वला वाणी यांनी मानले.

# बभळाज परिसरातील मोतीमाता यात्रोत्सव उत्साहात

बभळाज - शिरपूर तालुक्यातील श्री. क्षेत्र नागेश्वर शिवार अजनाड बंगला येथील जागृत देवस्थान मोती माता देवीच्या ४५ व्या प्रकट दिनानिमित्त यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याच परंपरेनुसार मोती माता परमभक्त मूर्ती संस्थापक स्व. मंडाआई यांच्या बभळाज येथील निवासस्थानी दि.१२ रोजी सायंकाळी देवीच्या विधिवत भोग प्रसादाचा व ध्वजपुजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर दि.१३ रोजी सकाळी आठ वाजता मोती माता पुजारी परशुराम महाराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मोती मातेचा व गुणा महाराजांच्या (अगेवान) ध्वजाची मिरवणूक बभळाज येथील सर्व जाती धर्माच्या लोकांनी मिळून काढली. ध्वज नागेश्वर परिसरातील मोती माता मंदिरावर नेण्यात आला. त्यानंतर नऊ वाजता नागेश्वर सेवा संस्थानचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, प.पू. संत आनंद चैतन्य महाराज, परशुराम महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. तदनंतर मोती मातेची विधीवत पूजा, आरती झाल्यानंतर भाविकांनी मातेचे दर्शन घेतले.

याप्रसंगी मानव विकास संस्थेचे भारतीय महासचिव तोताराम जाधव, जि.प.सदस्या बेबिबाई कुटवाल, मा.प स. सदस्य दर्यावसिंग जाधव, अजनाड गावाचे सरपंच दरबार जाधव, बभळाजचे मा. सरपंच जगन्नाथ अनार जाधव, अशोक चव्हाण, रणछोड जाधव, गोविंदा राठोड, संतोष जाधव, रोहिदास जाधव व विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# तळोदा न्यायालयाच्या नवीन इमारतीचा २६ ला लोकार्पण सोहळा

तळोदा-येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्गाच्या बहुप्रतिक्षीत व सुसज्ज नविन न्यायालयाची इमारत लोकार्पण सोहळा येत्या २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी होत आहे. यामुळे बऱ्याच वर्षापासून सुसज्ज न्यायालयाची इमारतीची नागरिकांची मागणी पुर्णत्वास येत आहे. न्यायालयाची नवीन इमारत काही दिवसातच नागरिकांच्या सेवेत उपलब्ध होणार आहे. यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या न्यायालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन २६ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती किशोर चंद्रकांत संत यांच्या हस्ते होत आहे. हा सोहळा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी भगवानराव कचरे यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. या सोहळ्याचे निमंत्रक तळोदा न्यायालयाचे दिवानी न्यायाधीश सुविधा पांडे व तळोदा वकील संघाचे अध्यक्ष अँड रवींद्र वाणी आहेत. महाराष्ट्र शासनाच्या न्याय व विधी विभागाकडून ७ कोटी २५ लाख रुपये खर्च करून न्यायालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. इमारतीचे काम अंतिम टप्प्यात सुरू आहे. इमारतीच्या आवारात रंगरंगोटी

व सुशोभीकरणाचे काम सुरु आहे. याव्यतिरिक्त, अद्ययावत न्यायालयाला आवश्यक असलेल्या सुसज्ज असे फर्निचर इमारतीत असणार आहे.

# नाशिक परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत व्हॉलिबॉलमध्ये धुळ्याची बाजी, विविध क्रीडा प्रकारात पदकांची कमाई : एसपींनी खेळाडूंचा सत्कार करीत दिले प्रोत्साहन

धुळे - ३५ वी नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२४-२५ या अहिल्यानगर येथे झाल्या. त्यात व्हॉलिबॉल सामन्यात धुळे जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावित गोल मेडल मिळविले.

याबद्दल हॉलिबाल संघातील खेळाडू व प्रशिक्षकांचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे व अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांनी आज विशेष कौतूक केले. प्रत्येक खेळाडूशी भेट घेत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.



पोलिस अधिक्षक कार्यालयासमोरील गार्डनमध्ये हा कार्यक्रम झाला. अहिल्यानगर येथे झालेल्या पोलिस क्रिडा स्पर्धेत धुळे जिल्हा पोलिस दलातील खेळाडूंनी देखील सहभागी होत चांगली कामगिरी केली.

हॉलिबॉल सामन्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच बास्केटबॉल, हॉकी, वेटलिफ्टींग व जुडो स्पर्धेत देखील पदके मिळाली आहे. याबद्दल पोलिस अधिक्षक श्री. धिवरे व अपर पोलिस अधिक्षक श्री. काळे यांनी हॉलिबॉल टीम व सर्व खेळाडूंचा सत्कार करीत त्यांना प्रोत्साहन दिले.

यावेळी खेळाडू मुकेश जाधव, दीपक चौधरी, भूषण खलाणेकर, अझहर शेख, राहुल गुंजाळ, गोपाल निळे, संदेश बैसाणे, राहूल गवळे, विनोद पाडेकर, सचिन माळी तसेच प्रशिक्षक संजय साळुंखे, सिताप्पा गवळी आदी उपस्थित होते.

# नवापूर येथे स्वामिनारायण सत्संग मंडळातर्फे झोळीपर्व

नवापूर - मकर संक्रांतीच्या दिवशी दान करण्याला अधिक महत्त्व आहे आणि म्हणूनच नवापूर येथील स्वामीनारायण सत्संग मंडळातर्फे दर वर्षाप्रमाणे यंदाही उकई मंदिराचे कोठारी संत पूज्य योगेश स्वामी पूज्य प्रभूवंदन स्वामी यांच्या उपस्थितीत झोळी पर्व अंतर्गत दान स्वीकारण्यासाठी फेरीचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकांनी दिलेले दान स्वीकारण्यात आले.



वेद, उपनिषद, भागवत आणि वचनामृत ग्रंथांमध्ये मकर संक्रांतीच्या दिवशी दानाचे महत्त्व आणि पुण्य सांगितले आहे. आपसातील कटुता विसरून तिळगुळच्या आदान प्रदानातून मनामनात स्नेहभाव निर्माण करणारा शुभ दिन म्हणून मकर संक्रांतीला दान करण्याचा विश्वभरात महिमा आहे. त्यानुसार बीएपीएस स्वामीनारायण संस्था संचालित नवापूर स्वामीनारायण सत्संग मंडळातर्फे झोळी पर्व दान स्वीकारण्यात आले. येथील नागरिकांनी या पुण्य कृतीला मोठा प्रतिसाद दिला. या मिळालेल्या सर्व दानाचा उपयोग उकई येथील स्वामीनारायण छात्रालयातील विद्यार्थ्यांसाठी केला जातो पूज्य प्रमुख स्वामी महाराज यांच्या आशीर्वादाने व पूज्य महंत स्वामी महाराज यांच्या प्रेरणेने भारतासह विविध देशात मकर संक्रांतीला झोळी पर्व दान स्वीकारण्यात आले.

झोळी पर्व दान स्वीकारण्यासाठी निघालेल्या फेरीत उकई मंदिराचे कोठारी संत योगेश स्वामी, प्रभूवंदन स्वामी, क्षेत्र निरीक्षक प्रा. राजेंद्र पाठक, कमलेश अग्रवाल, संजय अग्रवाल, हरीश प्रजापत, भटू जाधव, किशोर प्रजापत, डॉ. नरेंद्र पाटील, माजी नगरसेवक शिरीष प्रजापत, महेंद्र जाधव, जितु सोनी, बापू मोरे, कांतु प्रजापत, प्रफुल प्रजापत, नितीन पाटील, संजय अग्रवाल, विपुल प्रजापत, संदीप सोनवणे, विपुल प्रजापत, राकेश प्रजापत, अतुल प्रजापत, निरव प्रजापत, समीर प्रजापत, दर्शन सोनवणे, भूमिक प्रजापत, विशाल प्रजापत, स्मित प्रजापत, युग प्रजापत, प्रीत प्रजापत, अक्षर सोनी, अक्षय पाटील यांच्यासह मंडळाचे सत्संगी बांधव सहभागी झाले होते. या दान फेरीची सांगता छगन प्रजापत यांच्या निवासस्थानी झाली मंडळ संचालक प्रा राजेंद्र पाठक यांनी आभार मानले.

# आमलाड येथे दिड लाखाचे ऐवज घेऊन महिला पसार

मोड ता.तळोदा-तळोदा तालुक्यातील आमलाड येथील महिलेने सुमारे एकलाख सदोतीस हजार रुपये किंमतीचा ऐवज घेऊन पसार झाल्याची घटना दि.१३ जानेवारीला घडली आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत तळोदा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१३ जानेवारी सोमवारी आमलाड शहरापासून अवघे तीन किलोमीटर दूर अंकलेश्वर-ब-हाणपूर या राज्य मार्गावर असलेल्या गावात अनिताबाई पूर्ण नाव गाव पत्ता माहीत नाही या महिलेने गावातील सपना विजेंद्र वळवी रा.आमलाड हिचाकडून ३ ग्रॅम सोने मंगळपोत, ४ ग्रॅम सोने टोंगल, ३ ग्रॅम सोने अंगठी, ४ ग्रॅम सोने टोंगल, १६ तोळे चांदीचे पायातले सारण, ४ तोळे चांदी पाटल्या, ४ तोळे चांदी पायातले बेले व ५ साड्या असा एकूण ५५७०० रुपये किमतीचा ऐवज असेच निरोपाबाई विठ्ठल कोळी रा. आमलाड हिच्याकडून ६ ग्रॅम सोन्याचे टोंगल, ४.५ ग्रॅम सोन्याची बाली, ४.५ सोने पेंडल, ७.५ चांदीचे पायातले बेले, २ तोळे चांदी बेले, सोबत संसारोपयोगी वस्तू पितळी पातेले- १, पितळी - समई-३, पितळी परात १, स्टीलचे कुकर-२, खलबत्ता १, तगारी १, तवा-१, पितळी हंडा-१, तांब्याच्या कळश्या आदी एकूण ५ हजार २०० रुपये किमतीचा ऐवज तसेच अनिताबाई संजय वळवी रा. आमलाड हिच्याकडून ३० तोळे चांदीचे वाळे, ४० तोळे चांदीचे पायातले सारण, ३० तोळे चांदीचे गळ्यातील साखळी असा सुमारे ३० हजार रूपये किमतीच्या ऐवज घेऊन पसार झाल्याची घटना घडली. याबाबत सपना विजेन्द्र वळवी हिच्या दिलेल्या फिर्याद वरून संबंधित महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी-३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव-४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी** * **संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक / सहमत असतीलच असे नाही. **Email- dainikshauryamarathi@gmail.com** (RNI-MAHMAR/2023/89125)

# पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात ४६ विद्यार्थ्यांची अंतिम तर ३९५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड

जळगाव ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि जळगाव जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ जानेवारी २०२५ रोजी विद्यापीठात झालेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात ४६ विद्यार्थ्यांची अंतिम तर ३९५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली.

विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात झालेल्या या रोजगार मेळाव्यात ३६ कंपन्या सहभागी झालया होत्या त्यामध्ये जळगाव, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी येथील कंपन्यांचा समावेश होता.

या मेळाव्यासाठी ९०० तरूणांनी नोंदणी केली होती. काही विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदासाठी मुलाखतीची संधी असल्यामुळे एकूण १२७४ विद्यार्थ्यांच्या मुलाखती झाल्यात.

या मेळाव्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या रोजगार मेळाव्यातून ४६ विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली. ३९५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड झाली आहे.

या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन खा. स्मिताताई वाघ यांच्या हस्ते करण्यात आले . अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी होते.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, सहायक संचालक व सहायक केंद्रीय प्रेंटिशिप सल्लागार श्री. एन.सी. गांगडे, व्य.प. सदस्य ॲड अमोल पाटील, डॉ. पवित्रा पाटील, सिनेट सदस्य प्रा. विशाल पराते, नितीन ठाकूर, स्वप्नाली काळे, अमोल मराठे तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संदीप गायकवाड, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, कौशल्य अधिकारी वृषाली भडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना खासदार स्मिताताई वाघ म्हणाल्या की, तरूणांना रोजगार मिळावा यासाठी केंद्र आणि राज्य सरकार पुढाकार घेत आहे. या प्रयत्नात विद्यापीठ सहभागी झाल्यामुळे आनंद झाला.

जिद्द, मेहनत आणि कष्ट करण्याची तयारी ठेवली तर नोकरी अथवा व्यवसायात यश मिळते.

शरीराला आणि मनाला कष्ट आणि मेहनतीची सवय लावून घेण्याचे आवाहन खा. वाघ यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी समजासाठी जबाबदार नागरीक, देशासाठी संवेदनशील नागरीक आणि रोजगारक्षम विद्यार्थी तयार करण्याची जबाबदारी विद्यापीठावर आहे. या भागातील विद्यार्थी प्रामाणिक आणि परीश्रम करणारे आहेत मात्र संवाद कौशल्यात तो कमी पडतो. त्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेवून प्रशिक्षण देण्याचे काम सुरू केले असल्याचे प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले.

निखी गांगडे यांनी या मेळाव्यातून नोकरी प्राप्त झाली नाही तरी निराश न होता एनएटीएस च्या पोर्टलवर नोंदणी करावी. शासनाकडून विविध योजना राबबिल्या जात आहेत अशी माहिती दिली. प्रास्ताविकात संदीप गायकवाड यांनी कौशल्य विकास व उद्योजकता केंद्राकडून सुरु असलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

एका छताखाली कंपन्या आणि विद्यार्थी यांना आणण्याचे काम या मेळाव्यातून साध्य झाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. विजय घोरपडे यांनी केले तर केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक डॉ. रमेश सरदार यांनी आभार मानले. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रा. रमेश सरदार, डॉ. उज्ज्वल पाटील, सोनाली दायमा यांच्यासह विविध प्रशाळांमधील समन्वयक आदींनी परीश्रम घेतले.

# स्वसंरक्षणासाठी महिला, मुलींनी नेहमीच सज्ज असावे विद्यापीठातील कार्यक्रमात एस. टी. इंगळे यांचे आवाहन

जळगाव : महिला व विद्यार्थिनींनी त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी इतरांच्या मदतीची वाट न पाहता स्वतःच तयार असावे, असे आवाहन प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांनी केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागातर्फे केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सिक्युरिटी व मुलींचे संरक्षण' या विषयावर सोमवारी, कार्यशाळेत ते बोलत होते. आयोजित मंचावर जळगाव एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या सहायक निरीक्षक माधुरी बोरसे, सायबर सेलच्या हवालदार स्वाती पाटील, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य सोना कुमार व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील उपस्थित होते.

मिरचीची पूड जवळ ठेवा..... माधुरी बोरसे यांनी सांगितले की, महिलांनी आणि विद्यार्थिनींनी आपल्याजवळ स्व-संरक्षणासाठी मिरचीच्या पाण्याची पुडी किंवा मिरचीची पूड, तसेच सहज हातात येईल असे छोटे टोकदार हत्यार बाळगले पाहिजे. कराटे शिकले पाहिजे असे सांगितले.

त्यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपयोगी असणारे विविध ॲप व आपत्कालीन दूरध्वनी क्रमांकांची माहिती दिली. स्वाती तायडे यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर माहिती देताना विविध आमिष, फ्रॉड कॉल, व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांची माहिती देत सुरक्षिततेविषयी मार्गदर्शन केले. शिक्षिका प्रीती सोज्वळ, विद्या भालेराव, मीनाक्षी पाटील यांनी सायबर फसवणुकीचे प्रसंग कथन केले.

# मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन शिबीरासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उमविद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४ विद्यार्थ्यांची निवड

जळगाव ( प्रतिनिधी) :- मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन शिबीरासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.



दि. २६ जानेवारी रोजी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन होणार आहे. युवा व क्रिडा मंत्रालय भारत सरकार, रासेयो प्रादेशिक संचालनालय, पुणे, रासेयो मंत्रालय कक्ष यांच्या निर्देशान्वये दि. १७ ते २६ जानेवारी या कालावधीत मुंबई येथे पथसंचलन शिबीर होणार आहे. या शिबिरासाठी विक्की लांडगे (आदर्श महाविद्यालय,निजामपूर जैताणे,जि.धुळे), निखिल सामुद्रे (जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार), मनिषकुमार पाटील (काकासाहेब हिरालाल चौधरी महाविद्यालय, नंदुरबार) या तीन विद्यार्थ्यांची आणि हेमांगी मराठी (संगणकशास्त्र विभाग, कबचौउमवि,जळगाव) या विद्यार्थीनीची या पथसंचलन शिबिरासाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या रासेयो स्वयंसेवकांचे कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी अभिनंदन केले आहे.

### शोधूया स्वत:ला, समजूया स्वत:ला या विषयावर कार्यशाळा

जळगाव-कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेतील इलेक्ट्रॉनिक्स विभागात शोधूया स्वत:ला, समजूया स्वत:ला या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत शहादा येथील डॉ. उल्हास सोनवणे, प्रा.खेमराज पाटील, यांनी मार्गदर्शन केले. प्रशाळेचे संचालक प्रा.जयदीप साळी अध्यक्षस्थानी होते. विभागप्रमुख डॉ.डी.जी.शिराळे, संयोजक डॉ.जसपाल बंगे, सहसंयोजक डॉ. राहुल साळुंके, एम.एस.नेतकर यावेळी उपस्थित होते. सुत्रसंचालन हर्षदा साळुंके या विद्यार्थिनीने केले. ४ सत्रामध्ये ही कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वत:चे मूल्यांकन करुन आपल्यातील गुणवैशिष्ट्यांचा शोध घेऊन उज्वल भविष्य घडवणे हा कार्यशाळेचा हेतू होता.५०विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

# जगदाळे यांनी अचानकपणे पाळधी गावात जावून उपकेंद्रातील गावठाण आणि कृषी वाहिन्यांच्या विलगीकरण कामाची केली पाहणी

जळगाव : अधिकाधिक चांगल्या ग्राहकसेवा देण्यासाठी वापरलेल्या विजेच्या देयकांची देय तारखेच्या आत नियमितपणे वसुली होणे आवश्यक आहे. त्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याच्या सूचना महावितरणच्या कोकण (कल्याण) परिक्षेत्राचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी केली.

कोकण परिक्षेत्राचे सहव्यवस्थापकीय संचालक जगदाळे हे जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांच्या दौऱ्यावर असून बुधवार, दि. १५ रोजी सुरू झालेल्या दौऱ्यात त्यांनी महावितरणच्या जळगाव मंडळातील सातही विभागांचा उपविभागीय आढावा घेतला. अधिकाधिक चांगल्या ग्राहकसेवा देण्यासाठी देयकांची नियमितपणे वसुली होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

विद्युत वितरण क्षेत्रात ग्राहकाचे समाधान महत्त्वाचे आहे. अधिक चांगल्या ग्राहकसेवा देण्यासाठी वापरलेल्या विजेच्या देयकांची नियमितपणे वसुली होणे आवश्यक आहे. असे दिलीप जगदाळे, सहव्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी सांगितले.

जगदाळे यांनी अचानकपणे जळगाव शहरालगतच्या पाळधी गावात जाऊन तेथील उपकेंद्रातील गावठाण आणि कृषी वाहिन्यांच्या



विलगीकरण कामाची पाहणी केली. तेथील सुरक्षा आणि सुव्यवस्थेबाबत सूचना दिल्या. जळगाव ग्रामीण उपविभागातील वडाळी गावाशेजारील शेतीमधील सौर कृषिपंप व काही ठिकाणी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतील घराच्या छतावरील सौरप्रकल्पाची पाहणी केली.

अभय योजनेतून कायम खंडित झालेल्या ग्राहकांना प्रवाहात आणा. नागरिकांकडून विजेचा अधिकृत वापर होणे आवश्यक. वीजचोरीच्या प्रकरणात आवश्यक तिथे पोलिसांत गुन्हे दाखल करा. ग्राहकांना सहज व शक्य तितक्या सोप्या पद्धतीने तत्काळ नवीन वीजजोडणी द्या.

परिमंडल कार्यालयातील सभागृहात झालेल्या आढावा बैठकीस परिमंडलाचे मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी, परिक्षेत्राचे वित्त व लेखा विभागाचे महाव्यवस्थापक अनिल बराटे, जळगावचे अधीक्षक अभियंता अनिल महाजन, पायाभूत सुविधा विभागाचे अधीक्षक अभियंता मनोज विश्वासे, सहायक महाव्यवस्थापक अशोक केदारे यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते, अतिरिक्त कार्यकारी अभियंते व उपकार्यकारी अभियंते उपस्थित होते.

# अजिंठा सोसायटीलगत समांतर रस्त्याचे काढले अतिक्रमण

जळगाव : अजिंठा चौफुलीपासून ते अयोध्यानगरकडे जाणाऱ्या समांतर रस्त्यावरील अतिक्रमण मनपाच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या पथकाने गुरुवारी काढले.

या रस्त्याच्या कामालाही सुरुवात झाली आहे. येथील अतिक्रमणामुळे अयोध्यानगरातील नऊ वर्षाच्या मुलाला अपघातात जीव गमवावा लागला होता. त्यामुळे आक्रमक झालेल्या महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन अतिक्रमण काढण्याची मागणी केली होती.

अयोध्यानगर मधील रहिवाशांना महामार्गावर येण्यासाठी अजिंठा हाउसिंग सोसायटीलगत समांतर आहे; परंतु त्या समांतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असल्यामुळे नागरिकांना त्या रस्त्यावरून प्रवास करताना अनेक अडचणी निर्माण होतात.

त्यामुळे बहुतांश नागरिक थेट महामार्गावरून विरुद्ध दिशेने चौफुलीपर्यंत येतात. यामुळे बऱ्याच वेळा अपघात घडतात. या अपघातांमुळे अनेकांना जीवदेखील गमवावा लागला आहे.

काही दिवसांपूर्वी कालिंका माता चौकाजवळ डंपरच्या धडकेत नऊ वर्षांचा मुलगा जागीच ठार, तर त्याचा मामा जखमी झाला होता.

या घटनेनंतर संतप्त महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन समांतर रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी आयुक्तांना सूचना केल्या होत्या, यामुळे अजिंठा चौकापासून ते अयोध्यानगरकडे जाणाऱ्या समांतर रस्त्याचे अतिक्रमण काढण्यात आले.

# वाळू माफियांकडून महसूल पथकातील कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की, चौघांना अटक

जळगाव - जळगाव जिल्ह्यात अवैध वाळू माफियांची दबंगगिरी वाढली असून त्यांच्याकडून महसूल पथकावर होणारे हल्ले देखील वाढताना दिसत आहे. अशातच पाचोरा तालुक्यातील अंतुर्ली खुर्द येथे अवैध वाळूची वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडल्याने वाळू माफियांनी वाद घालत महसूल पथकातील कर्मचाऱ्यांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली. पथकातील तलाठ्याला एकाने ट्रॅक्टरवरून खाली ओढले. याबाबत चार जणांना अटक करण्यात आली आहे.

राज भाऊसाहेब पाटील, दुर्गेश ऊर्फ नानू भाऊसाहेब पाटील, विवेक ऊर्फ भावड्या वसंत पाटील, हिरालाल निंबा पाटील (सर्व रा. अंतुर्ली, खुर्द, ता. पाचोरा) अशी अटक करण्यात आलेल्या वाळू माफियांची नावे आहेत. अंतुर्ली खुर्द येथे अवैधरीत्या वाळूचा साठा करण्यात आल्याची माहिती महसूल पथकाला मिळाली होती. यानंतर महसूल विभागातील चार जणांचे पथक या गावात पोहचले. त्यात निपाणे तलाठी तात्याराव माणिकराव सपकाळ, बाळद बुद्रुकचे तलाठी अतुल बापूराव पाटील, पुनगावचे तलाठी तेजस रोहिदास बऱ्हाटे आणि पाचोरा तलाठी गंगाधर अण्णाराव सुरनर यांचा समावेश होता.

पथक तिथे पोहचले त्यावेळी एक ट्रॅक्टर गिरणा नदी पात्रातून येताना दिसले. पथकाने हे वाहन थांबवले असता, वाळू माफियांनी पथकाला मारहाण केली. तलाठी अतुल पाटील ट्रॅक्टरवर चढले असता त्यांना खाली ओढत वाळू माफियांनी ट्रॅक्टर पळवून नेले. त्याठिकाणी ६४ हजार रुपयांची अवैध वाळू जप्त करण्यात आली.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जळगांव यांच्या वतीने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन संपन्न

जळगाव- दि.१७/१/२०२४ रोजी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य वतीने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचानालय मुबई संचालक सतीश सुर्यवंशी यांच्या आदेशनवये तसेच जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी श्री संतोष साळुंखे मार्गदर्शनाखाली कवयित्री बहिणाबाई चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जळगांव व जिल्हातील सर्व आय टी आय यांच्या सहभागातून शासकीय



अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव प्रांगणात आयोजित जिल्हा क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन डॉ सुहास गाजरे प्राचार्य अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव यांनी केले.

प्रसंगी एम एस राजपूत , शिवकुमार जुमनाके प्राचार्य आय टी आय भुसावळ/पाचोरा तसेच सस्थेच्या उपप्राचार्य राजश्री पाटील उपस्थीत होते. गट निदेशक नितीन चौधरी यांनी प्रस्तावना केली.

सूत्रसंचलन महेश सुर्यवंशी यांनी केले. एल पी धांडे, डी डी देवरे, एम पी पाटील, सि वि घोडके, एस आर बोरोले व सर्व शिल्पनिदेशक, कार्यालयीन कर्मचारी, व सर्व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

आभार एन एस एस कार्यक्रम कार्यक्रम अधिकारी रमेश सपकाळ यांनी मानले.

जा.क्र./न्या.वि./३०६१/२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक जिल्हा, नाशिक
जानकी प्लाझा, खरबंदा पार्क, पुणेरोड,
व्द्वारका, नाशिक,
दिनांक: ०६/०६/२०२४
चौकशी अर्ज नंबर: ४१/२०२३

**चौकशीची जाहीर नोटीस**

सार्वजनिक न्यासाचे नांव : ज्ञानोदय मंडळ, अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव. पी.टी.आर. नंबर: नोंदणी नंबरः ई-२२६.

या बाबत संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मदाय सह. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक हे वर नमूद केलेल्या चौकशी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० चे कलम ४७ अन्वये विश्वस्त नियुक्तीसाठी खालील मुद्दयावर चौकशी करणार आहेत.

न्यासाचे विश्वस्त होण्यासाठी खालीत व्यक्तींनी अर्ज केलेला आहे.

**अर्जदार :**
१. श्री. पुंडलिक सखाराम धायले, वयः ७८, शिक्षण जुनी ११ वी, धंदा अध्यक्ष व समाजसेवक, रा. अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
२. श्री. नारायण पांडू पुन्नासे, वय ७५, शिक्षण जुनी ११ वी, धंदा: समाज सेवक रा. अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
३. श्री. रमेश भोजू महाजन, वय ६८, शिक्षण एम. ए. डी. एड. धंदा सेवानिवृत्त शिक्षक व समाज सेवक, रा. अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
४. सुधाकर पंडीत धायले, वय ५२, शिक्षण: एम.ए., धंदा: शेती व समाज सेवक रा.ः अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
५. डॉ. मनोज साहेबराव पाटील, वय ५१, शिक्षण बी.ए. एम. एस. धंदा वैद्यकिय व समाजसेवक, रा.: लोहारखेडे, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
६. श्री. सुधाकर राजाराम चौधरी, वय ७६, शिक्षण: ११ वी, धंदा: शेती व समाज सेवक रा.ः पिंप्रीनांदू, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
७. श्री. विनोद रामदास तराळ, वय ५०, शिक्षण: बी.ए., धंदा समाज सेवक रा.ः अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
८. श्री. संजय दत्तु महाजन, वय ५८, शिक्षण बी. कॉम., धंदा शेती व समाज सेवक रा. कर्की, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.
९. श्री. वामन गणपत दवंगे, वय ६७, शिक्षण १० वी, धंदा शेती व समाज सेवक रा.: अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव.

**विरुध्द**
**सामनेवाले :**
सेनू आनंदा भोई, वयः ८५, धंदा शेती, रा. अंतुर्ली, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव

त्याअर्थी तमांम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील न्यासाचे विश्वस्त नेमणुकी संदर्भात कोणाचीही, काहीही हरकत असल्यास सदर हरकत मे. धर्मदाय सह. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयात सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आंत नोंदवाव्यात किंवा या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने टपालाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अथवा प्राप्त न झाल्यास मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. पुढील सुनावणीच्या दिवशी सदर चौकशी सुनावणी पुर्ण करण्यात येवून निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

कळावे,
**ही चौकशीची जाहीर नोटीस**
**दिनांक : ०६/०७/२०२४**
**स्थळ : नाशिक**

सही/-
लिपीक
नाशिक

शिक्का

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

# वाहतुकीचे नियम पाळा, व्यसनांपासून दूर रहा – डॉ. महेश्वर रेड्डी

जळगाव - विद्यार्थ्यांनी सिगारेट व इतर व्यसनांपासून दूर राहावे, वाहतुकीचे नियम पाळावेत, आणि पोलिस दलात करिअर घडवण्यासाठी प्रयत्नशील रहावे, असे मार्गदर्शन पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी केले.

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमित्त आयोजित शस्त्र, श्वान पथक, वायरलेस, पोलीस बॅण्ड, बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, पोलीस उपअधीक्षक संदीपकुमार गावीत, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.च्या पर्सोनेल विभागाचे वरिष्ठ व्हाईस प्रेसिडेंट सी. एस. नाईक, युवाशक्ती फाऊंडेशनचे विराज कावडिया उपस्थित होते. त्यासोबत शनिपेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आर.टी.धारबळे, रामानंदचे राहुल गुंजाळ, तालुका पोलीस स्टेशनचे संजय गायकवाड, शहर पोलीस स्टेशनचे अनिल भवारी, मुख्यालयातील राखीव पोलीस उपनिरीक्षक मंगल पवार, पीएसआय राजेश वाघ यांच्यासह अधिकारी व पोलीस दलातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जळगाव जिल्हा पोलीस



दल, भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शस्त्र प्रदर्शना ७००० च्यावर विद्यार्थ्यांनी भेट देऊन पोलीसांशी संवाद साधला आणि शस्त्रां संबंधित माहिती समजून घेतली. हा उपक्रम गेल्या १० वर्षांपासून जळगावकरांसाठी आयोजित केला जातो. शस्त्र प्रदर्शनातून पोलीस दलाची ओळख झाली. शस्त्र प्रदर्शनात विद्यार्थ्यांना पोलीस दलातील अत्याधुनिक शस्त्रसामग्री, उपकरणे आणि तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पोलीस दलातील जबाबदाऱ्या आणि संधींबाबत उत्सुकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांना बीडीएस विभागातील प्रकाश महाजन, नरेंद्र ठाकूर, आशिफ पिंजारी, पंकज सोनवणे, रामदास साळुंखे, राखीव पोलीस दलातील आशिष चौधरी, दीपक पाटील, संतोष सुरवाडे, सुभाष धिरबस्सी, अजित तडवी यांच्यासह क्युआरटी टीम, आरसी प्लाटुन नं.७ मधील कर्मचाऱ्यांनी शस्त्रांविषयी माहिती समजून सांगितली. पोलीस बँड पथकाने विशेष सादरीकरण यावेळी केले.

डॉ. महेश्वर रेड्डी म्हणाले,पोलिस दलातील सेवा ही केवळ नोकरी नाही, ती समाजसेवेचे एक मोठे साधन आहे. विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून यासाठी स्वतःला तयार करावे. मोबाईलच्या अतिवापरापासून सावध राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिवापरापासून स्वतःला दूर ठेवावे, तसेच सायबर फसवणूक टाळण्यासाठी सतर्क राहावे, असे आवाहनही त्यांनी केले. खोट्या कॉल्सना बळी पडू नका, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## चोपडा महाविद्यालयात 'वार्षिक स्नेहसंमेलन' व पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

चोपडा(प्रतिनिधी)- येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ.सुरेश जी. पाटील महाविद्यालयात आज दि.१६ जानेवारी २०२५ रोजी आयोजित 'वार्षिक स्नेहसंमेलन' तसेच 'वार्षिक स्नेहसंमेलनाचा पारितोषिक वितरण समारंभ' उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.आर.एम. बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ.के.एन.सोनवणे, उपप्राचार्य डॉ. ए.बी.सूर्यवंशी, समन्वयक डॉ.एस.ए.वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस.पी.पाटील, पर्यवेक्षक ए.एन. बोरसे, कनिष्ठ विभागाचे समन्वयक पी.एस. पाडवी, रजिस्ट्रार डी. एम.पाटील आणि कनिष्ठ विभागाचे स्नेहसंमेलन प्रमुख एन.बी.शिरसाठ तसेच वरिष्ठ विभागाचे स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.पी.के.लभाणे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी स्नेहसंमेलन सांस्कृतिक कार्यक्रमाचे परीक्षक दिग्दर्शक मकरंद चौधरी व कलाकार राहुल निकुंभ यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी एकलनृत्य, आदिवासी नृत्य, समूहनृत्य तसेच युवारंग स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या समूह वादन, समूह नृत्य व मूकनाट्याचे तसेच 'मिठी निंद' या नाटिकेचे सादरीकरण करून श्रोत्यांची वाहवा मिळविली. या कार्यक्रमाला रसिकांचा भरभरून प्रतिसाद लाभला.




या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू-भगिनींसाठी आयोजित रांगोळी, मेहंदी, बुद्धिबळ, कॅरम, क्रिकेट, हॉलीबॉल, बेसबॉल, हॅन्डबॉल, एकलनृत्य, समूहनृत्य, एकांकिका, नाटिका, एकल गायन, समूह गायन, आनंद मेळावा, पाककला, संगीत शेला पागोटे व कागदी शेला पागोटे आदि स्पर्धांमध्ये विजेत्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू-भगिनींना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी जिमखाना विभागातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व ट्रॅकसूट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी म्हणाले की, 'विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनातून आपले कलागुण प्रदर्शित करण्याची संधी उपलब्ध झाली त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी करून घेतला. नक्कीच आपल्या व्यक्तिमत्वात व आत्मविश्वासात यामुळे भर पडेल यात शंका नाही'. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सौ. क्रांती क्षीरसागर,सौ. कांचन पाटील व सौ. सुनीता पाटील यांनी केले तर आभार सौ.कांचन पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू-भगिनी तसेच वार्षिक स्नेहसंमेलन विविध समिती प्रमुख व सदस्य यांनी परिश्रम घेतले. या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.

## ह.भ.प.रविकिरण महाराज यांचे आडगावला जाहीर कीर्तन संपन्न

चोपडा (प्रतिनिधी)- तालुक्यातील आडगाव येथील उतरानदेवी यात्रेनिमित्त दि.१६ रोजी ह.भ.प.रविकिरण महाराज यांचे जाहीर कीर्तन संपन्न झाले.हजारो श्रोते यावेळी उपस्थित होते.

आडगावचे ग्राम दैवत उत्तरान देवी जत्रा दिनांक १४ रोजी मकर संक्रांति निमित्त भरत असते. या पार्श्वभूमीवर पूर्वी फार वर्षांपूर्वी या यात्रेत महिला नर्तकींचा तमाशा होत होता परंतु नव्या पिढीने ही परंपरा आता मोडीत काढली असून, यंदा प्रथमच यात्रेनिमित्त ग्रामस्थांनी वर्गणी गोळा करून ह भ प रविकिरण महाराज यांचे जाहीर कीर्तन ठेवले होते.



आपला तो देव एक करुनी घ्यावा.. तेणेविणे जीवा सुख नोहे या अभंगावर त्यांनी श्रोत्यांना मार्गदर्शन केले.आडगाव, तावसे बुद्रुक, नरवाडे वडती, विरवाडे, अंबाडे नारोद, खरग, नागलवाडी, बोरअजंती या व इतर पंचक्रोशीतील भाविक यावेळी हजर होते. अहिराणी मराठी भाषेत त्यांनी श्रोत्यांना मनमुराद हसविले. भजनी मंडळाचे त्यांना साथ संगत दिली.

## वड्रीजवळ अवैध वाळू वाहतूक करणारे डंपर महसूल विभागाच्या पथकाने पाठलाग करून पकडले

यावल- वड्रीजवळ अवैध वाळू वाहतूक करणारे डंपर महसूल विभागाच्या पथकाने पाठलाग करून पकडले. तर हे डंपर नदीपात्रात फसल्याने चालकाने तेथेचं डंपर सोडून दिले होते. पथकाने जेसीबीने नदीपात्रातून डंपर काढून तहसील कार्यालयात लावून डंपर मालकास दंडाची नोटीस बजावली आहे.

वड्री येथे रात्री तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांच्या मार्गदर्शनात महसुलचे पथक गस्तीवर होते.

तेथे जळगाव येथील सुशील मोतीलाल पाटील यांच्या मालकीचे डंपर (एमएच- १९, सीवाय ८४८१) हे अवैधरित्या वाळू वाहतूक करतांना आढळून आले.

पथकाने चालकास थांबण्याचा इशारा केला, मात्र चालक व पाळधी



येथील नीलेश सुनील मिस्तरी याने वाहन घेवून पळ काढला.

गस्ती पथकाने या डंपरचा पाठलाग केला असता अंधारात खडकाई नदीपात्रात डंपर फसले.

त्यानंतर चालकाने वाहन जागेवरच सोडून पोबारा केला.

तर गस्ती पथकाने नदीत फसलेले डंपर जेसीबीच्या साह्याने बाहेर काढले. ही कारवाई मंडळाधिकारी मीना तडवी, ग्राम महसूल अधिकारी उमेश बाभुळकर, सुनील कुंभार, मिलिंद कुरकुरे, पंढरी अडकमोल, विजय साळवे, शरीफ तडवी, मंडळाधिकारी एम. एच. तडवी, अश्विन दुर्गे, निशांत मोहोड, राजू पारधी, संजय दंडगोल, अतुल घाडघे, समीर तडवी, वाहन चालक अरविंद बोरसे यांनी केली. हे डंपर तहसील कार्यालयात लावले असून डंपर मालकास दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.

दरम्यान, नदीपात्रात फसलेले डंपर काढण्याकरीता वड्रीचे सरपंच अजय भालेराव यांच्यासह स्थानिक पोलिस पाटलांनी मदत केली.

महसुल विभागाने रात्रभर नदीतून डंपर काढण्याकरिता मेहनत घेतली तर पहाटे नदीतून जेसीबीच्या साह्याने हे डंपर बाहेर काढण्यात यश आले.

## नाहाटा महाविद्यालयात एक दिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात

### यसंशोधकांनी केले 'संगणक व माहिती तंत्रज्ञानातील नवीन विचार प्रवाह' विषयावर विवेचन

भुसावळ -येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागातर्फे सलग दहाव्यांदा आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. या परीषदेत सुमारे ४० ते ५० संशोधक प्राध्यापक तसेच संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ताप्ती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मोहन फालक उपस्थित होते.

यात संगणक व माहिती तंत्रज्ञानातील नवीन विचार प्रवाह या विषयावर सखोल असे विवेचन उपस्थित संशोधकांनी केले. तसेच ४० संशोधकांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले. या परिषदेचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहन फालक (अध्यक्ष ताप्ती एज्युकेशन सोसायटी भुसावळ) यांनी केले. या परिषदेसाठी महेश फालक (चेअरमन ताप्ती एज्युकेशन सोसायटी भुसावळ), विष्णू चौधरी (सेक्रेटरी ताप्ती एज्युकेशन सोसायटी भुसावळ), संजयजी नाहाटा (कोषाध्यक्ष ताप्ती एज्युकेशन सोसायटी भुसावळ), प्रभारी प्राचार्य डॉ. सुनील पाटील, उपप्राचार्य डॉ.बी.एच. बहाटे, कनिष्ट महाविद्यालय उपप्राचार्य प्रा योगेश एम. पाटील, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. गजेंद्र आर वाणी, डॉ. गौरी



पाटील, आयोजन समिती सचिव प्रा. हर्षल पाटील, डॉ. स्वाती फालक, प्रा. पुनम महाजन तसेच प्रमुख वक्ते डॉ. वंदना चौधरी (जी. जी. खडसे महाविद्यालय मुक्ताईनगर) यांची उपस्थिती लाभली. ही परीषद एकूण तीन सत्रात पार पडली. उद्घाटन प्रसंगी सुत्रसंचालन प्रा. पुनम महाजन व प्रा. मेघा चौधरी यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन प्रा. हर्षल पाटील यांनी केले.

प्राथम सत्रात प्रा.डॉ. वंदना चौधरी यांची बीजभाषण सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत झाले. आपल्या बीजभाषणात त्यांनी इमेज प्रोसोसींग फ्रॉम पिक्सेल टू इनसाइटस या विषयावर सविस्तर व अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले.

व्दितीय सत्र दुपारी १२.३० ते ४.०० या वेळेत संपन्न झाले असून त्यात संशोधकांनी शोधनिबंधाचे वाचन केले. तिसरे व परीषदेचे समारोपाचे शेवटचे सत्र दुपारी ४ ते ५ या वेळेत पार पडले. त्यासाठी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एच. बन्हाटे, उपस्थिम होते. मान्यवरांनी सहभागी संशोधक प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांना प्रमाणपत्र वाटप केले. या संपूर्ण परीषदेचे संयोजक उपप्राचार्य डॉ. बी. एच. बहाटे, डॉ गजेंद्र आर वाणी, डॉ गौरी एम पाटील, आयोजन समिती सचिव प्रा. हर्षल व्ही पाटील, डॉ स्वाती फालक, प्रा पुनम महाजन व सर्व संगणक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक पीरश्रम घेऊन यशस्वीरीत्या पार पाडली.

## शेतकऱ्यांची शेत रस्त्यांसाठी होणारी हेळसांड थांबवा

### महाराष्ट्र शिवपाणंद शेतरस्ता चळवळीतर्फे यावल तहसीलदारांना निवेदन

यावल -पिढ्यान पिढ्या शेतकऱ्यांचा शेतरस्त्यासाठी चाललेला संघर्ष थांबावा यासाठी महाराष्ट्र राज्य शिवपाणद शेतरस्ता चळवळीच्या वतीने राज्यभर सुरू केलेल्या आंदोलनाला राज्यभर मोठा शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळत असून जिल्हा तहसील कार्यालयात शेतरस्त्या संबंधात गांभीर्य निर्माण करत गावोगावचे शेतकरी चळवळीत सहभागी होत असून या आंदोलनाला न्यायालयीन प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय कार्यालयाकडून शेतकऱ्यांची शेतरस्त्यांसाठी होणारी हेळसांड थांबवण्यासाठी विविध सामाजिक संघटना अन्नदात्याच्या पाठीशी उभे राहत आहेत.

यावल तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांचेकडे महाराष्ट्र शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने निवेदन दिले असता तहसीलदार नाझीरकर यांनी लवकरच पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नियोजित बैठकीत राजव्यापी आंदोलनाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी रावेर शिव पानंद शेतरस्ता कृती समितीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर यावल तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी प्रशासनाला शेतरस्त्या संबंधित विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी तहसीलदारांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांना गांभीर्याने घेत शासन निर्णयाच्या अंमलबजावणी करत विशेष परिपत्रक काढत गावोगावी ग्राम शेतरस्ता समित्या स्थापन करण्याचे निर्देश ग्रामपंचायतींना देणार असून शासन निर्णयाच्या अंमलबजावणी करण्यासंदर्भात सूचना संबंधित विभागांना देण्यात येतील. शेतकऱ्यांनी तहसीलदारांनी शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर राखत शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेतल्यामुळे शेतकऱ्यांनी तहसीलदारांचा सन्मान करत त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरदभाऊ पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्याकडून चळवळीच्या वतीने धन्यवाद व्यक्त करण्यात आले यावेळी यावल तालुका शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे सचिन चौधरी, भगवान पाटील, विजय पाटील, अविनाश पाटील, गणेश पाटील, जितेंद्र पाटील, पंढरीनाथ पाटील, अरुण चौधरी, सर किनगाव यांसह असंख्य शेतकरीमोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यावल येथे भीषण आगीत दुकान खाक

### शेजारी असलेल्या घरालाही आगीचा बसला फटका

यावल : शहरातील फैजपूर रस्त्यावर विस्तारित भागात असलेल्या हरी ओम नगरातील दुकानाला आग लागली. मंगळवारी पहाटे पूर्वी लागलेल्या या आगीत दुकानातील सर्व साहित्य जळून खाक होत तब्बल १४ लाखांचे नुकसान झाले आहे.

या आगीचा फटका शेजारील घराला देखील बसला आहे. शेजारील घराच्या खिडकी, दरवाजे देखील जळून ३९ हजारांचे नुकसान झाले आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे.संजेरी ग्लास या शेख जाकीर शेख कमरोद्दिन, शेख अलतमस शेख जाकीर यांच्या दुकानास ही आग लागली.

तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांच्या सूचनेनुसार मंडळ अधिकारी मीना तडवी, तलाठी गजानन पाटील, प्रदीप पाटील, ज्ञानेश्वर पाटील यांनी याठिकाणी पंचनामा केला. या आगीमध्ये दुकानदाराचे १४ लाख ७ हजार रूपयांचे साहित्य जळाल्याचा पंचनामा करण्यात आला आहे. घटनास्थळी पंचायत समितीचे माजी गटनेचा शेखर पाटील, काँग्रेस आदिवासी सेल तालुका अध्यक्ष बशीर तडवी आदींसह विविध स्थानिक लोकप्रतिनिधींनी घटनास्थळावर भेट देऊन पाहणी केली.

आगीत दरवाजे खिडक्या आणि इतर साहित्य जळून झाले खाक या आगीमध्ये दुकानातील प्लाऊड तसेच ॲल्युमिनियमच्या खिडक्या, दरवाजे तयार करणारे व प्लाऊड कटिंग करणारे तसेच ॲल्युमिनियम कटिंग करणाऱ्या विविध प्रकारच्या मशिनरी तसेच ॲल्युमिनियमच्या सीट, प्लाऊडचे शीट, तयार झालेल्या खिडक्या दरवाजे, तसेच काच व फर्निचरचे आगीत नुकसान झाले.

## रासेयो मध्ये संधी हा जीवनातला सुवर्णक्षण-ॲड. अर्जुन पाटील

बोदवड- आज रासेयो जलचक्र येथे संपन्न होणाऱ्या बोदवड कला व वाणीज्य महाविद्यालयाच्या शिबिरामध्ये ॲड. अर्जुन पाटील यांनी वरील प्रतिपादन केले .

सोशल मीडिया वापर, युवकांची व्यसनाधीनता, वकिली क्षेत्रातील विविध संधी या सर्व यासह विविध सोशल मीडियाचा ध्येय गाठण्यासाठी उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, वकील क्षेत्रामध्ये आज जागतिक संधी उपलब्ध झालेली आहे.

वकिली क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी तुम्हाला जगातील विविध विद्यापीठ तुम्हाला शिष्यवृत्ती व प्लेसमेंट उपलब्ध करून देत आहे. तुम्ही विविध देशांच्या लीगल प्रोसेसिंग आऊट सोर्स द्वारा भारतामध्ये राहून किंवा जगाच्या कोणत्याही क्षेत्रात राहून वकील क्षेत्रामध्ये सर्वोच्च करिअर घडू शकतात . हे करत असताना मात्र तुम्ही सोशल मीडियाचा स्वतः च्या यश आणि संधीसाठी सदुपयोग करून घ्या तसेच महाविद्यालयातील तरुणांना यावेळी ॲड. अर्जुन पाटील यांनी निर्व्यसणी राहण्याची शपथ दिली.

तर राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी हे देशाचे खऱ्या अर्थाने देश घडवण्याचं काम करत असतात.

समाजाचे काम करत असतात आणि राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये असणारा तरुण हा समाजाप्रती कटिबद्ध असतो .आणि त्याला राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सात दिवसाची ही जी मिळालेली संधी आहे. व त्या संधीचा महाविद्यालयीन तरुणांनी सदुपयोग करून त्यांचे कलागुण यांचा विकास करावा, मी ही रासेयो कॅम्पचा विद्यार्थी होतो असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी भारतीय राज्यघटना यावर ॲड. धनराज प्रजापति, तर स्पर्धा परीक्षा आणि त्यातील संधी यावर ॲड. किशोर महाजन, महिलांना आणि कायदा यावर देवयानी बोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोसेयो विदयार्थी हरीकेश सोनवने व पाहुण्यांचा परीचय प्रिया इंगळे यांनी केल . यावेळी वकील संघातर्फे शाल व पुष्पगुच्छ देऊन रासेयो प्रा. नितेश सावदेकर, प्रा.डॉ. वंदना नंदवे, प्रा.ज्ञानेश्वर तिवारी, प्रा. तुषार सोनवणे, प्रा.शरद पाटील, तसेच उपप्राचार्य डॉ. विनोद चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष वकील संघाचे अध्यक्ष अँड. अर्जुन पाटील, सचिव धनराज प्रजापति, सहसचिव अँड किशोर महाजन, प्राध्यापक वर्ग, ॲड. योगेश राजपूत हे होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रीसेयो विद्यार्थी, जलचक्र गावकरी मंडळी, प्रतिक डोळस कल्पेश बडगुजर यांनी परीश्रम घेतले. आभार प्रर्दशन हरीकेश सोनवने यांनी केले.

## धरणगाव येथे खान्देश प्रवासी असोसिएशनचे पश्चिम रेल्वे डीआरएम यांना विविध मागण्यांचे निवेदन

धरणगाव – धरणगाव रेल्वे स्टेशन येथे पश्चिम रेल्वेचे डी.आर.एम. पंकज सिंग, एडीआरएम तिवारी, वरिष्ठ डीसीएम अभयसिंग चव्हाण, सीएमआय पंकज पांडे अमळनेर, संदीप गुप्ता, एडीएन संजय गुप्ता, आरपीएफ अधिकारी यांसह अन्य अधिकाऱ्यांनी अमृत योजनेअंतर्गत कार्याचा आढावा घेण्यासाठी भेट दिली होती. त्याप्रसंगी धरणगाव येथील खान्देश प्रवासी असोसिएशन तर्फे पश्चिम रेल्वेचे डी.आर.एम. पंकज सिंग यांना झेड आर.यु.सी.सी. सदस्य प्रतीक जैन यांच्या उपस्थितीत धरणगाव आणि खान्देशातील विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद मागण्या पुढीलप्रमाणे: १) भुसावळ ते पुणे व्हाया धरणगाव-अमळनेर-नंदुरबार-पुणे नवीन



गाडी सुरू करणे. २) १९००५/०६ सुरत-भुसावल पॅसेंजर च्या वेळेत बदल करणे. ३) धरणगाव येथे १९०४५/४६ ताप्तीगंगा एक्सप्रेस व १९४८३/८४ बरोनी एक्सप्रेस या गाड्यांना थांबा देणे. ४) ०९०५१/५२ ०९०४९/५० गाडी भुसावळ-दादर गाडी कायमस्वरूपी करणे. ५) धरणगाव स्टेशन अमृत भारत योजनेअंतर्गत प्लान विषयी सूचना. ६) ५९०७५/७६ भुसावल-नंदुरबार गाडी सुरत पर्यंत करणे. ७) अमळनेर येथे प्रेरणा एक्सप्रेस व अन्य रेल्वे थांबा देणे. ८) १९१०५/०६ भुसावळ-उधना गाडीला भोणे स्टेशन येथे थांबा देणे. ९) LC No RUB १३७ १४१, १४२, १४५, १४७ या बोगद्यांमध्ये पाणी साचणे. आणि रस्ता दुरुस्ती. आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मागण्यांसंदर्भात चर्चा करताना धरणगाव येथे गुड्स रॅक (मालधक्का) सुरु करण्याबाबत डीसीएम अभयसिंग चव्हाण यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

याप्रसंगी खान्देश प्रवासी असोसिएशनचे अध्यक्ष कमलेश तिवारी, सचिव श्रेयांस जैन, सहसचिव ॲड. नंदनराव पाटील भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड.संजय महाजन, उपाध्यक्ष चंद्रकांत भावसार सदस्य ॲड.युवराज रायपूरकर, जतिन नगरिया, नारायण महाजन, प्रशांत भाटिया, दिनेश पाटील, संभाजी सोनवणे, महाजन व झेड. आर.यु.सी.सी. सदस्य प्रतीक जैन आदी उपस्थित होते.

## लोहारा येथे ज्येष्ठ नागरिक संघ व माणुसकी ग्रुपतर्फे मकर संक्रांत उत्साहात

लोहारा, ता. पाचोरा । वार्ताहर -मकर संक्रांत म्हणजे 'तिळगुळ घ्या, गोड गोड बोला' दरवर्षीप्रमाणे संपूर्ण गावात ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांनी दुपारी गावात तिळगुळ वाटप करून तसेच संध्याकाळी माणुसकी ग्रुपतर्फे सेवा वस्तीवरील कुटुंबांमध्ये जाऊन तिळगुळ वाटप करून मकर संक्रांत उत्साहात साजरी करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांशी आपुलकीने

व प्रेमाने गप्पा करून चर्चासत्र ठेवण्यात आले. तसेच त्यांच्या विविध समस्या या माध्यमातून समोर आल्यात. तरुण व ज्येष्ठ नागरिक संघाने



एकाच दिवशी तिळगुळ वाटप केल्याने गावात वेगळाच आनंद निर्माण झाला होता.

यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भास्कर अंबिकार, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन प्रभाकर चौधरी, बाबुलाल बोरसे,

बाबुलाल सुतार, लक्ष्मण बनकर, दत्तात्रय क्षिरसागर, उपसरपंच दीपक खरे, ग्रामपंचायत सदस्य अनिल तडवी, पत्रकार दीपक पवार, माणुसकी ग्रुप जळगाव जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार गजानन क्षिरसागर, उमेश देशमुख, अमोल पाटील, संदीप क्षिरसागर, रवींद्र क्षिरसागर, गजानन परदेशी, योगेश कोळी, उत्कर्ष गुणवंत क्षिरसागर आदी नागरिक व महिला तसेच माणुसकी ग्रुप सदस्य उपस्थित होते.